# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in


अतितात्काळ

क्रमांकः-तंशिस/विकाना/ डीबीटी पोर्टल- ट्रेनिंग /2017/ 2974

दिनांक 27 OCT 2017

प्रति,

सर्व प्राचार्य,

शासकीय,अनुदानित व विनाअनुदानित संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषयः- शैक्षणिक वर्ष 2017-18 करिता महाराष्ट्र शासनाच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या महाडीबीटी पोर्टल बाबतची माहिती देण्यासाठी ओरीएंटेशन/ट्रेनिंग प्रोग्राम.

संदर्भः- मा. संचालक,तंशिसं,म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.18/तंशिसं/डीबीटी पोर्टल- ट्रेनिंग-2/2017/184 दि.26/10/2017

उपरोक्त संदर्भान्वये सर्व संस्थांना कळविण्यात येते, की शैक्षणिक वर्ष 2017-18 पासुन महाराष्ट् शासनाच्या नव्याने सुरू करण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाडीबीटी पोर्टल/MahaDBT Portal व्दारे तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा. मुंबई याचेमार्फत खालील योजना राबविण्यात येणार आहेत.

1.**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना**

2.**डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना**

3.**उच्च व्यावसायिक व इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना(वैद्यकिय अभ्यासक्रम वगळून)**

वरील योजनासाठी नव्याने सुरू झालेल्या महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ-www.mahadbt.gov.in व http://mahadbt.gov.in या लिंकवर ऑनलाईन अर्ज भरून घेण्यासाठी तरतूद महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे. सदर संकेतस्थळांवर वरील योजनेच्या नियम, अटी व शर्तीची सविस्तर माहिती करून देण्याकरिता Orientation Programme for Mahadbt Portal 2017-18 बाबतचे प्रशिक्षण **दि.**01/11/2017 रोजी 10.00 वा. **अंजूमन अभियांत्रिकी महाविद्यालय,**मंगळवारी बाजार,सदर, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे.

**सदर प्रशिक्षणास सर्व संस्थेचे प्राचार्य व शिष्यवृत्ती योजनांचे कामकाज हाताळणारा कर्मचारी तसेच जिल्हा प्रशिक्षणांसाठी सुचविण्यात आलेल्या शासकीय तंत्रनिकेतनातील अधिकारी व कर्मचा-यांनी व्यक्तिशः प्रशिक्षणास उपस्थित राहावे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज सादर करतांना ज्या अडचणी उदभवत आहे. त्या अडचणी सदर प्रशिक्षणास मांडण्यात याव्या जेणे करून सदर अडचणी दूर करता येईल.**

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर.

प्रतः- 1. मा. संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई.